| | |
|---|---|
| MHSO200023602022 | **नियमित दिवाणी दावा क्र. ६००/२०२२** |

## निशाण क्र. २८ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. १ मुरलीधर तुकाराम रामोशी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगीसाठी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. १ मुरलीधर तुकाराम रामोशी हे दि. ०५/०४/२०२४ रोजी मयत झाले असून प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादी यांनी विनंती केली.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादींचा वारस अभिलेखावर आणण्याच्या अर्जाच्या कामी विलंब माफीचा अर्ज व अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज मंजूर झाल्याशिवाय प्रस्तुत अर्ज कायद्याने चालणार नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रतिवादींविरुध्द साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पृष्टयार्थ वादींनी नि.क्र. २९ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. अभिलेखावर दाखल नि.क्र. ८९/१ वर दाखल असलेल्या मृत्यूदाखल्यावरुन मयत प्रतिवादी अभिलेखावर दाखल नि.क्र. ४४/१ वर दाखल असलेल्या मृत्यूदाखल्यावरुन मयत प्रतिवादी क्र. १ मुरलीधर तुकाराम रामोशी हे दि. ०५/०४/२०२४ रोजी मयत झाल्याचे निदर्शनास येते. वादींच्या अर्जातील कथन तसेच

दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादीस प्रतिवादी क्र. १ यांचे वारसांना अभिलेखावर घेणेची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता झालेला विलंब माफ होण्यासाठी वादींनी नि.क्र. २४ वर अर्ज दाखल केला असून तो अर्ज या न्यायालयाने मंजूर केला आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो,

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो. वादींनी नि.क्र. २४ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांना मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी तसेच तद्‌अनुषांगिक दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देण्यात येते.

२. वादींनी दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत अभिलेखावर सादर करावी.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE

Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.04.20 17:23:31 +0530

**(एस. एस. साळुंखे)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

दिनांक – २०/०४/२०२६

सांगोला.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २०/०४/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | २०/०४/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | २०/०४/२०२६ |